दिनांक २६ जानेवारी २०१८ - प्रजासत्ताक वर्धापन दिन समारंभात चित्ररथ संचलनासाठी येणारा खर्च रुपये ५,५५०००/- इतक्या रक्कमेस मंजुरी मिळण्याबाबत

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांक: टिआरए-१२१७ /प्र.क्र.३५९/पोल-८
मंत्रालय, मुंबई -४०० ०३२,
दिनांक:- ११ जानेवारी, २०१८

वाचा : १) सामान्य प्रशासन विभागाचे पत्र क्र.सीईआर-२०१७/प्र.क्र.१८३/३०, दि. ३.११.२०१७
२) सहआयुक्त पोलीस आयुक्त (वाहतुक) वरळी, मुंबई यांचे पत्र क्र. २८/ अपोआ/वा/प्रजा. दिन/२०१८, दि.०२.०१.२०१८ व दि.०६.०१.२०१८
३) पोलीस आयुक्त बृहन्मुंबई यांचे पत्र क्र.०३ पोआ/कक्ष-१४/ अर्थसं-५/ २०१८दि.०६.०१.२०१८
४) वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे परिपत्रक क्र.मुंविनि-२०१७/ प्र.क्र.३८/२०१७/विनियम दि.१८.१२.२०१७

शासन निर्णय :-

भारतीय प्रजासत्ताक ६८ वा वर्धापन दिन दिनांक -२६ जानेवारी २०१८ रोजीचा समारंभात गृह विभाग (वाहतुक) यांच्या चित्ररथाचे संचलन होणार आहे. सदर चित्ररथाच्या संचलनासाठी येणारा खर्च रुपये ५,५५०००/- (पाच लक्ष पंचाव्वन हजार फक्त) इतकी रक्कम खालील तपशिलाप्रमाणे संक्षिप्त देयकावर काढण्यास एक विशेष बाब म्हणून शासन मंजुरी देण्यात येत आहे. सह पोलीस आयुक्त (वाहतूक), वरळी, मुंबई हे नियंत्रक अधिकारी म्हणून सदर देयकांच्या एकूण रुपये ५,५५,०००/- (पाच लक्ष पंचाव्वन हजार फक्त) इतक्या रक्कमेच्या तरतूदीचे वितरण करतील.

अ.क्र.	तपशिल	अंदाजित खर्च (रुपये)
१	चित्ररथ सजावट	
	फॅब्रीकेशन	२,५०,०००/-
	डिजाईनींग	१,५०,०००/-
	पेटींग	२५,०००/-
	इलेक्ट्रीशियन	३०,०००/-
२	ट्रकचे भाडे (१० दिवस)	६०,०००/-
३	ऑडिओ रेकॉर्डिग	४०,०००/-
	एकुण खर्च	**५,५५,०००/-**

२. विषयाधिन मंजूरी खालील विहित अटीच्या अधीन राहून देण्यात येत आहे:-

१. शासन परिपत्रक क्र.मविनि-२०१७/प्र.क्र.३८/१७/विनियम, दिनांक १८ डिसेंबर, २०१७ मधील सुचनेनुसार " मागणी क्र.बी-०१,२२५५ पोलीस, १०८ राज्य मुख्यालय पोलीस, (०२) शहर पोलीस, (०२)(०१)आस्थापना, (२०५५००९७) १३ कार्यालयीन

खर्च ” लेखाशिर्षाखाली दि.३०.०९.२०१७ यापूर्वीची तपशिलवार देयक प्रलंबित नाही.

२. दि.३०.०९.२०१७ नंतरच्या संक्षिप्त देयकावर काढलेल्या सर्व तपशिलवार देयकांचा तत्परतेने निपटारा करण्यात येईल.

३. या संक्षिप्त देयकाचे तपशीलवार देयक एक महिन्याच्या आत सादर करण्यात येईल.

४. खर्च नियमित देयकाद्वारे करणे शक्य नसून त्यासाठी संक्षिप्त देयकावर रक्कम काढणे अनिवार्य आहे.

५. या संक्षिप्त देयकाचे तपशिलवार देयक विहित मुदतीत सादर करण्याची जबाबदारी आहरण व संवितरण अधिकारी यांची राहिल.

६. मासिक निधी विवरणपत्रानुसार याकरीता निधी उपलब्ध आहे.

३. प्रस्तुत प्रकरणी होणारा खर्च गृह विभाग मागणी क्र.बी-०१,२२५५ पोलीस, १०८ राज्य मुख्यालय पोलीस, (०२)शहर पोलीस, (०२)(०१)आस्थापना, (२०५५००९७) १३ कार्यालयीन खर्च या लेखाशीर्षाखाली सन २०१७-१८ च्या मंजूर अनुदानातून भागविण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने अनौपचारीक संदर्भ क्र.११/२०१८/व्यय-७ आणि अनौपचारीक क्र.१७/२०१८/विनिमय, दिनांक १०.०१.२०१८ अन्वये दिलेल्या मान्यतेस अनुसरुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०११११२१२४०९३२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

Sudhakar D. Pawar

Digitally signed by Sudhakar D. Pawar
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=2c1ebd27661971090dc2c91d4bb9caabd4da394aa85829a09265097faf097ba5, cn=Sudhakar D. Pawar
Date: 2018.01.11 12:15:46 +05'30'

(सु.धो.पवार)
अवर सचिव, गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रति,

१. पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई
२. सह पोलीस आयुक्त (वाहतूक),वरळी, मुंबई.
३. महालेखापाल, महाराष्ट्र-१ (लेखा वअनुज्ञेयता / लेखापरिक्षा), मुंबई.
४. अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई.
५. वित्त विभाग(कार्यासन व्यय-७/ विनियम), मंत्रालय, मुंबई.
६. अवर सचिव,(कार्यासन बीयुडी-१), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
७. निवडनस्ती / गृह विभाग (पोल-८)